FORM-1A 0068616 N.C.R.B.

I.I.F.-I

# पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

**फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)**

1. राज्य State: महाराष्ट्र, जिल्हा District: मुंबई, पोलीस ठाणे Police Station: आ.प्र.वि. मुं., पहिली खबर क्र. FIR No.: ३५, वर्ष Year: २०२३, दिनांक Date: २०/१०/२०२३
2. (i) अधिनियम Act: भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८, कलमे Sections: कलम - ७
   (ii) अधिनियम Act: —, कलमे Sections: —
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections: ...
3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day: मंगळवार, तारीख पासून Date from: ०३/१०/२३, वेळ Time: १७.३०, तारीख पर्यंत Date to: ११/१०/२३, वेळ Time: १७.३०

   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).

   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00

   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00

   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date: ०३/१०/२०२३, वेळ Time: १७.३०

   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No.: २/२३, तारीख Date: २०/१०/२०२३, वेळ Time: ०२.३०
4. माहितीचा प्रकार Type of Information: लेखी, लेखी / तोंडी Written / Oral: —
5. गुन्हा घडल्याचे ठिकाण Place of Occurrence : (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Direction and distance from P. S. ..., चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O.P. Name and No. ...

   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name: शिधावाटप कार्यालय, नंबर No. if any: क्र. २७-ग, गल्ली Ward: कुर्मन नगर, रस्त्याचे नाव Name of road ...

   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place: गोरेगाव (प.), मुं. ४०० १०४, गाव Village, पोस्ट Post, तालुका Taluka ..., जिल्हा Dist. ..., राज्य State ...

   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station ..., तालुका Taluka ..., जिल्हा Dist. ..., राज्य State ...
6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

   (a) नाव Name: दुर्गेश सुरेंद्रनाथ मिश्रा (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name: श्री. सुरेंद्रनाथ मिश्रा.

   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age: ४० वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality: भारतीय, फोन नं. Phone No.: ९८१९७६१७८१

   (e) पारपत्र क्रमांक Passport No.: —, दिल्याचा दिनांक Date of Issue: —, दिल्याचे ठिकाण Place of Issue: — (f) व्यवसाय Occupation: शिधावाटप दुकान

   (g) धर्म Religion: हिंदू, जात Caste: —, जनजात Sub-Caste: —

   (h) पत्ता Address: रूम नं. / गल्ली Ward / घर / नाव नं. House/Name No.: राजस्थान चाळ, दुर्गा नगर, फोन / मो. नं. Phone/M. No. / पॅन नं. PAN No. / कार्ड नं. Card No.: मुलुंड लिंक रोड, बिट मेट्टी,

   रस्त्याचे नाव Road: गोरेगाव (पूर्व), जवळचे ठिकाण Nearest identifiable place: मुंबई ४०००६३, गाव Village ..., पोस्ट Post ..., पो. स्टे. P. Stn. ...

   तालुका Taluka ..., जिल्हा Dist. ..., राज्य State ..., सध्याचा पत्ता Present Address ...
7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)

   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

   सुधीर राजाराम मेजारी, वय ५२ वर्षे, धंदा-नोकरी (सहा. शिधावाटप अधिकारी शिधावाटप कार्यालय क्र. २७-ग, गोरेगांव (प.), मुं. ४००१०४), राही- यमुना सरकारी वसाहत, आर. टी. धमानी मार्ग, वरळी सी फेस, वरळी, मुं. १८, मो. नं. ९८६७११ ३०५३.

Y.P.P.-3,200 Bk.-(25×6=150 Lvs)-3-2021-PA3-(K) 347

Scanned with OKEN Scanner

यातील फिर्यादी श्री० दुर्गेश सुरेंद्रनाथ मिश्रा, वय ४० वर्षे, धंदा- शिधावाटप दुकान, राही- खो.नं. २, राजस्थान चाळ, दुर्गा नगर, मुलुंड लिंक रोड, पिटमट्टी, गोरेगांव पूर्व, मुंबई- ४०००६३ यांचा स्वतंत्र पानावर नोंद करण्यात आलेला जबाब हीच गुन्ह्याची प्रथम खबर संबोधण्यात येत आहे.

समक्ष

(सुरेंज बनसोडे)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुं.

दुर्गेश मिश्रा

Scanned with OKEN Scanner

फिर्यादी जबाब

दि. १९/१०/२०२३

श्री. दुर्गेश सुरेंद्रनाथ मिश्रा, वय ४० वर्षे, व्यवसाय– रेशनिंग दुकान चालविणे, पत्ता – रुम नं ०२, राजस्थान चाळ, दुर्गानगर, विटभट्टी, न्यु मुलुंड लिंकरोड, गोरेगाव पूर्व मुंबई–६३, मोबाईल क्र. ९८१९७६९७८१ आधार नं.– ७३५३६६८८४५९६

मी वर नमुद ठिकाणी माझे कुटुंबासह गेल्या २० वर्षांपासून राहतो मी रेशनिंग दुकाने भाडेत्तवावर चालविण्यास घेऊन त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नावर माझा व माझ्या कुटुंबियांचा उदरनिर्वाह चालतो.

श्रीमती अरुणा कान्तीलाल मोटा व श्री. भोला राम देवासी यांचे मालकीचे तीन डोंगरी, प्रेमनगर, गोरेगांव पश्चिम येथे असलेले रोहन जनरल स्टोअर रेशनींग दुकान क्र.२७ ग १७४ गेल्या तीन वर्षांपासून भाडेतत्वावर चालवित होतो. त्यानंतर श्री. नागोराव तुलसी राम दवने यांचे मालकिचे ३८/१/१ भगतसिंग नगर नं.२, श्रीरंग साबळे मार्ग, कॉस लिंक रोड, गोरेगांव पश्चिम, मुंबई–४००१०४ या ठिकाणी असलेले सिध्दार्थ किराणा स्टोर्स रेशनिंग दुकान क्र.२७ ग १४७ हे सप्टेंबर २०२३ पासून भाडेतत्वावर चालविण्यास घेतलेले आहे. त्याबाबत दिनांक २१/०९/२०२३ रोजी रू १००/– च्या स्टॅम्प पेपरवर "नोकरनामा" करण्यात आला आहे.

मी चालवत असलेले रेशनिंग दुकानाचे इन्स्पेक्शन करीता गोरेगाव पश्चिम येथील रेशनिंग अधिकारी श्री. मेजारी साहेब हे तीन किंवा चार महिन्याने येतात. त्यावेळी श्री. मेजारी साहेब हे इन्स्पेक्शन मध्ये कोणतीही त्रुटी न दाखविण्यासाठी रु. २५,००० लाचेची मागणी करतात. जर त्यांना पैसे दिले नाहीत तर प्रत्येक घरी जावून रेशनिंग मिळाले किंवा नाही याबाबत चौकशी करतात व संबंधीत रेशनिंग दुकानाचे लायसन्स सस्पेंड करण्याची धमकी देतात. श्री. मेजारी साहेबांनी मी तीन वर्षांपासून चालवित असलेले तीन डोंगरी, प्रेमनगर, गोरेगांव पश्चिम येथील रेशनिंग दुकान क्र. २७ ग १७४ या दुकानाच्या त्रुटी काढून माझेकडे रु. २५,०००/– लाचेची मागणी केली होती सदर लाच मी त्यांना न दिल्याने त्यांनी माझे सदर रेशनिंग दुकानाचे लायसन्स सस्पेड केलेले आहे.

मी दिनांक २१/०९/२०२३ रोजीच्या नोकरनाम्या प्रमाणे चालविण्यासाठी घेतलेले रेशनिंग दुकान क्र. २७ ग १४७ या दुकानाचे मंथली बिट रू. ३०००/– लाच म्हणून श्री. मेजारी साहेब मागतात व सदरची रक्कम न दिल्यास सदर दुकानाचेही लायसन्स सस्पेंड करण्याची धमकी देत आहेत. रेशनिंग अधिकारी श्री. मेजारी साहेब हे सप्टेंबर महिन्याचे मंथली बिट रू. ३०००/– लवकरात लवकर देण्याबाबत तगादा लावीत असून जर पैसे नाही दिल्यास दुकानाचे लायसन्स सस्पेंड करीन अशी धमकी दिली.

रेशनिंग अधिकारी श्री. मेजारी साहेब यांना त्यांनी मागणी केल्याप्रमाणे लाचेची रक्कम देण्याची माझी इच्छा नसल्याने मी दिनांक ०३/१०/२०२३ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी मुंबई येथे समक्ष हजर राहून कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी यांना भेटून तक्रार केली. वरिष्ठांनी माझी भेट पोलीस निरीक्षक सुरज बनसोडे यांचेशी करून दिली व ते पुढील कारवाई करतील असे सांगितले. पोलीस निरीक्षक सुरज बनसोडे यांना मी वर नमूद प्रमाणे चालवित असलेल्या रेशनिंग दुकानाकरीता रेशनिंग अधिकारी श्री. मेजारी साहेब हे लाचेची मागणी करीत असुन त्यांचेवर कायदेशीर कारवाई करणेबाबत माझे स्वहस्ताक्षरातील हिंदीतील लेखी तक्रार अर्ज दिला. सदर वेळी पोलीस निरीक्षक सुरज बनसोडे यांनी पोलीस निरीक्षक अजित झांजुर्णे यांचेशी माझी ओळख करून दिली व ते पर्यवेक्षक अधिकारी म्हणून काम पाहतील असे सांगितले. त्यानंतर पोलीस निरीक्षक सुरज बनसोडे यांनी दोन शासकीय पंचांना बोलावून त्यांची ओळख माझेशी करून दिली. त्यानंतर पंचांनी माझेकडे तक्रारीबाबत विचारणा करून मी दिलेला तक्रार अर्ज वाचून पाहिला. सदरचा अर्ज मीच दिलेला आहे याची खात्री करुन त्यावर दोन्ही पंचानी सहया व पो.नि. बनसोडे यांनी समक्ष म्हणून सहया केल्या. नमुद तक्रारी अर्ज पो.नि. बनसोडे यांनी स्वत:चे ताब्यात ठेवला. त्यानंतर पो.नि. बंनसोडे यांनी मी केलेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने आज रोजी पडताळणी करण्यात येईल असे सांगितले.

Scanned with OKEN Scanner

सदर कारवाईकरिता दोन शासकीय पंचांसह पोलीस पथक नेमण्यात आले असून श्री. मेजारी साहेब यांनी पैशांची मागणी केल्याप्रमाणे रकमेची जमवाजमव मला करण्यास सांगितले. त्यावेळी मी माझेकडे माझे बचतीतील रक्कम असल्याबाबत पो.नि. बनसोडे, झांजुर्णे व पंचांना सांगितले.

त्यानंतर पो.नि. बनसोडे यांनी मला मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दि. ०३/१०/२०२३ रोजी पंचासमक्ष पडताळणी कारवाई करण्यात येणार असून, पडताळणीला जाताना माझे बनियनला व्हॉईस रेकॉर्डर लावुन माझे सोबत एक पंच पाठविण्यात येणार असल्याचे सांगितले. त्याप्रमाणे श्री. मेजारी साहेब यांना त्यांच्या कार्यालयात अथवा ते सांगतील तेथे जाऊन भेटण्याचे ठरले. तसेच पडताळणी कारवाईसाठी जाताना शासकीय वाहन वापरण्यात येणार असल्याचे सांगितले. पो.नि. बनसोडे यांनी मला तसेच दोन्ही पंचांना पडताळणीच्या कार्यवाही बाबत माहिती दिली तसेच डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरबाबत माहीती समजावुन सांगितली व मेजारी साहेब यांच्या कार्यालयात जाऊन त्यांची भेट घेण्याच्या सूचना दिल्या. सदर सूचना नुसार मी पडताळणी करीता माझे सोबत पंच अजित डाकरे यांना घेऊन त्यांच्या कार्यालयात गेलो. त्यावेळी मेजारी साहेब हे दुसऱ्या कामात व्यस्त असल्याने मी व पंच त्यांचे कार्यालयात थोडा वेळ थांबून राहिलो परंतु मेजारी साहेब व माझ्यात कोणतेही बोलणे न झाल्याने काहीवेळाने मी व पंच सदर कार्यालयातून पोलीस वाहन थांबलेल्या ठिकाणी परत आलो. माझे मेजारी साहेब यांचे सोबत कोणतेही बोलणे झाले नसल्याने पुन्हा पडताळणी करण्यात येईल असे पो.नि सुरज बनसोडे यांनी सांगितल्याने मी, पंच व पोलीस पथक वरळी कार्यालयात परत आलो.

दिनांक ०४/१०/२०२३ पासून माझ्या मुलगा आजारी असल्याने मी त्यास औषध उपचार करीता असताना त्यास डेंगु झाल्याचे पो.नि. बनसोडे यांना सांगितले. दिनांक १७/१०/२०२३ रोजी मेजारी साहेबांनी त्यांचे कार्यालयातील शिधावाटप निरीक्षक, श्री. वाडकर साहेब यांचे मार्फत त्यांना भेटण्याकरीता येण्याचे सांगितले. त्यानंतर मी पो.नि. बनसोडे यांना फोनद्वारे अशी माहिती देऊन उद्या कार्यालयात येतो असे सांगितले.

आज रोजी पो.नि. बनसोडे यांनी सांगितल्या प्रमाणे सकाळी ११.३० वाजता वरळी ऑफीस येथे आलो. तेव्हा पो.नि. बनसोडे यांनी मला दिनांक ०३/१०/२०२३ रोजी पडताळणीचा वेळी दिलेल्या सुचनांप्रमाणे पुन्हा सुचना देऊन मी, दोन पंच व पोलीस पथक असे पडताळणी करण्याकरीता पोलीस वाहनातून रवाना झालो. आम्ही गोरेगांव येथील उन्नत नगर, म्हाडा गार्डन येथे आल्यानंतर पोलीस वाहन थांबविले. त्यानंतर पो.नि.बनसोडे यांनी मला तसेच दोन्ही पंचांना पडताळणीच्या कार्यवाही बाबत पुन्हा माहिती दिली तसेच डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरबाबत माहीती समजावुन सांगितली व मेजारी साहेब यांच्या कार्यालयात जाऊन त्यांची भेट घेण्याच्या सूचना दिल्या.

सदर सूचना नुसार मी पडताळणी करीता माझे सोबत पंच अजित डाकरे यांना घेऊन त्यांच्या कार्यालयात गेलो. त्यावेळी त्यांचे कार्यालयातील सर्व स्टाफ जेवण करत असल्याने आम्ही थोडा वेळ दरवाज्याजवळ बाहेर थांबलो नंतर थोडया वेळाने दरवाज्यामधून डोकावले असता मला श्री. मेजारी साहेबांनी इशाऱ्याने आत बोलविलेने मी आत गेलो व पंच डाकरे हे दरवाज्याजवळ थांबून राहिले. त्यावेळी श्री. मेजारी यांनी मला " **कल आया था,** " असे विचारले असता मी " **कुछ बाकी था क्या?** अशी विचारना केली. त्यावेळी त्यांनी " **दो महिना**" असे बोलून " **मै फोर सेवन की बात की खाली**" असे बोलले. व हाताने इशारा केला त्यावेळी मी " **फिगर.. फिगर...** अशी विचारणा केली असता मेजारी साहेबांनी " **हमे मालूम है, तुमको मालूम है**" असे म्हणून " **ये देखो इधर..**" असे बोलून उजव्या हाताची तीन बोटे दाखविली असता त्यावेळी मी **तीन.. ना., आता हूँ** असे म्हटले असता त्यांनी मानेने होकार दर्शवून ३ हजार रुपयाची मागणी केली म्हणून मेजारी साहेबांकडे पैसे जमा करण्याकरीता थोडावेळ मागून घेतला व तेथून पोलीस पथक थांबले असल्याचे ठिकाणी परत आलो.

समक्ष

(सुरज बनसोडे)
पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि., मुंबई

फिर्यादी श्री. दुर्गेश सुरेंद्रनाथ मिश्रा यांचा दिनांक १९/१०/२३ रोजीचा जबाब पुढे चालू

मी परत आलेनंतर पोनि बनसोडे यांनी पंचाकडे व माझेकडे सदर ठिकाणी काय घडले याबाबत विचारणा केली असता मेजारी यांनी उजव्या हाताचे तिन अंगुली दर्शवून रु. ३,०००/- लाचेची मागणी केली असल्याबाबत सांगितले. त्यांनतर पो.नि. बनसोडे व पो.नि. झांजुर्णे यांनी व्हाईस रेकॉर्डर चालू करुन त्यातील संभाषण ऐकले व पंचाचे समक्ष केलेल्या इशाऱ्यावरुन मेजारी साहेबांनी मंथली बिट म्हणून रुपये ३०००/- हजाराची लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर पो.नि बनसोडे यांनी माझ्याकडे लाचेची रक्कम मागितल्याने मी माझ्याकडील रुपये ५००/- दराच्या ०६ नोटा पो.नि.बनसोडे साहेबांकडे दिल्या मी दिलेल्या लाचेच्या रक्कमेस पोलीस पथकातील चालक अंमलदाराकडून अॅन्थ्रासीन पावडर लावण्यात आली. तदनंतर पोनि बनसोडे, यांच्या सुचनेप्रमाणे मी व पंच अजित डाकरे असे मेजारी साहेबांच्या कार्यालयाच्या दिशेने निघालो. मी व पंच अजित डाकरे असे मेजारी साहेबांच्या कार्यालयात जाताना रेशनिंग ऑफीस मध्ये माणसांची वर्दळ नसल्याने मी, पंच डाकरे यांना दरवाज्याजवळ इशाऱ्याने थांबण्यास सांगून. मी कार्यालयात गेलो असता मेजारी साहेब हे मला **आऊ क्या** असे म्हणाले व मी त्यांना **आऔ साहेब** असे बोललो व ते त्यांच्या टेबल वर येऊन बसले व त्यांनी माझ्या मुलाच्या तब्येती बाबत चौकशी केली व त्यांनी पैसेबाबत हाताने इशारा केल्यानंतर मी ३,०००/- हजार रुपये त्यांचे मागणीप्रमाणे मी माझ्या शर्टाच्या डाव्या बाजूच्या खिशातील पैसे उजव्या हातानी काढून ते मेजारी साहेबांचे हातात दिले. व उरलेले **" बिस , पच्चीस को कर देता हुं"** असे सांगितले असता त्यांनी मुलाचे तब्बेतीबाबत चौकशी करुन **"ये बी लेके जावो, और मै आपको आने के बाद कौनसा महिने का कुछ नही बोलुंगा" असे बोलून** मेजारी साहेबांनी मी दिलेले पैसे त्यांच्या टेबलच्या ड्रॉव्हर मध्ये ठेवले. त्यानंतर मी मेजारी साहेबांना नमस्कार करुन कार्यालयाच्या बाहेर निघून आलो व पंचासोबत कार्यालयाच्या गेटच्या जवळ आल्यानंतर पो.नि. बनसोडे यांना डावा हात केसांवर फिरवून मेजारी साहेबांनी पैसे घेतल्याबाबत इशारा केला.

मी इशारा केल्यानंतर पोनि बनसोडे,पो.नि.झांजुर्णे व पोलीस पथक तसेच मी दोन्ही पंच असे शिधावाटप कार्यालयात गेलो. तेव्हा पो.नि.बनसोडे यांनी मेजारी साहेब कोण याबाबत विचारले असता मी व पंच यांनी मेजारी साहेबांकडे अंगुलीमुद्रा निर्देशित केल्यानंतर पोलीस पथकाने मेजारी साहेबांना ताब्यात घेतले. त्यावेळी पो.नि.बनसोडे व पो.नि. झांजुर्णे यांनी त्यांचेकडे लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता त्यांनी उडवाउडवी उत्तरे दिली. तेव्हा मी मेजारी साहेबांनी, माझ्याकडून लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर ते बसत असलेल्या टेबलाच्या ड्रॉव्हर मध्ये ठेवल्याचे पो.नि.बनसोडे यांना सांगितले.

तरी गोरेगाव पश्चिमेचे सहाय्यक शिधावाटप अधिकारी श्री. मेजारी साहेब यांनी माझ्याकडे मी चालविण्यास घेतलेल्या रेशनिंग दुकान क्रमांक २७ ग १४७ चे महिन्याचं मंथली बिट म्हणून रुपये ३०००/- हजाराची लाचेची मागणी केली व सदरची रक्कम त्यांनी स्विकारली म्हणुन माझी. सहाय्यक शिधावाटप अधिकारी श्री. सुधीर मेजारी यांचे विरूध्द कायदेशीर तक्रार आहे.

माझे, सहाय्यक शिधावाटप अधिकारी श्री. सुधीर मेजारी यांचेशी कोणतेही पुर्ववैमनस्य अथवा आर्थिक देवाणघेवाणीचे व्यवहार नाहीत.

माझी वरील फिर्याद संगणकावर मराठीत टंकलिखीत केली असून ती मला वाचुन दाखवुन हिंदीत समजावुन सांगितली ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष

( सुरेंद्र बनसोडे )
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

दुर्गेश मिश्रा

Scanned with OKEN Scanner

...राने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........ तात्काळ

...sons for delay in reporting by the complainant/informant

...रीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

........................................................................................................................................

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ..........................................................

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ..........................................................

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील फि"हे भाडेतत्वावर चालवित असलेले शिधावाटप दुकान क्र. २०/ग-१०४ चे लायसन हे
नमूद आलोसे सुधीर राजाराम मेस्त्री, तहा. शिधावाटप अधिकारी (तपासणी) शिधावाटप कार्यालय
क्र. २०/ग यांनी सस्पेंड केले होते. त्यानंतर फि"नी दि. २१/०८/२३ पासून नोकरनामा करारावर
शिधावाटप दुकान क्र. २०/ग-१४० हे चालविण्यास घेतले तेव्हापासून नमूद आलोसे यांनी
दरमहा रु. ३०००/- देण्यासाठी फि" कडे तगादा लावला व सदर रक्कम न दिल्यास दुकानाचे
लायसन सस्पेंड करण्याची धमकी दिली म्हणून फि"नी दिलेल्या तक्रारीवरुन दि. १९/१०/२३
रोजी केलेल्या पडताळणीत आलोसे यांनी रु. ३०००/- ची लाचेची मागणी करुन ती स्विकारली
असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले म्हणून भ्र. प्र. अधिनियम ... अन्वये गुन्हा नोंद.

13. केलेली कार्यवाही – 1. वरील फिर्यादीवरून कलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : श्री. सुरज बाबासाहेब बनसोडे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. मुंबई

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ..........................................................

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन .................., जिल्हा .................., राज्य ..................

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.).................. Rank................ No................ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to.................................................. (3) Transferred to P. S. .................................................. District.................................................. on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.

(R.O.A.C.)

INSPECTOR OF POLICE — ANTI-CORRUPTION BUREAU — MUMBAI

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही
Signature of Officer in-charge, Police Station
संपूर्ण नाव Name श्री. सुरज बनसोडे
पदनाम Rank पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड क्र. ला.प्र.वि. मुंबई
Posting
Code No. of I. O. ..........................................

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख..........................
1. Date and time of submitted to the Court.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत, | 2. फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of **First Information Report**

Scanned with OKEN Scanner